शुक्रवार, दि. ०९ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भास्कर दानवेंच्या प्रचाराने विरोधकांची ‘हवा’ काढली

# प्रभाग 01 मध्ये भाजपचा ‘सुपर स्ट्राईक’

## पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; विजय निश्चित होण्याची चिन्हे





**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये प्रभाग क्रमांक ०१ भाजपसाठी ‘स्ट्राँग होल्ड’ ठरत असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. भाजपचे अधिकृत उमेदवार भास्कर आबा दानवे यांनी प्रचाराच्या रणांगणात अशी मुसंडी मारली आहे की, विरोधक अक्षरशः बॅकफूटवर गेले आहेत. जनतेचा मिळणारा प्रतिसाद पाहता, हा विजय नसून भाजपचा वर्चस्वशाली सत्ता प्रवेश असल्याचे चित्र दिसत आहे. प्रचाराच्या मैदानात विरोधक कुठेच दिसत नसताना भाजपचे उमेदवार मात्र दररोज गल्लोगल्ली, घराघरांत पोहोचत मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. त्यामुळे विरोधकांचा प्रचार केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहिल्याचे चित्र आहे.

भास्कर दानवे यांच्यासह कल्याण भदनेकर, ज्योती सले, सुशील दानवे व पदमा मानधाणी या भाजपाच्या अधिकृत उमेदवारांनी प्रचारात स्पष्ट आघाडी घेतली असून नागरिकांकडून मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांचा विजय आता केवळ औपचारिकतेपुरताच उरल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. या पाचही उमेदवारांनी एकत्रितपणे प्रचार मोहीम अधिक प्रभावीपणे राबवून मतदारांशी थेट संवाद साधण्यावर भर दिला आहे.

आज दिनांक ८ जानेवारी रोजी प्रभागातील सकलेचा नगर, मानकरतन नगर व मनीषनगर परिसरात भाजप उमेदवारांची पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेदरम्यान नागरिकांनी उमेदवारांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. महिलांनी फुलांची उधळण करत शुभेच्छा दिल्या, तर युवकांनी कमळच आमची पसंती अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पदयात्रेमुळे प्रचाराला चांगलीच रंगत आली. अनेक नागरिकांनी घराबाहेर येत उमेदवारांशी संवाद साधत आपल्या अपेक्षा मांडल्या. विकासकामांची मागणी, पाणी, रस्ते, स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था आदी प्रश्नांवर उमेदवारांनी ठोस आश्वासने दिली.

**विकासाच्या मुद्द्यावर भाजपचा भर**

भास्कर दानवे यांनी प्रचारादरम्यान सांगितले की, प्रभागातील मूलभूत सुविधांचा विकास, रस्त्यांची दुरुस्ती, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, आरोग्य व शिक्षण सुविधा यावर विशेष भर देण्यात येणार आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून प्रभागाचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तर इतर उमेदवारांनीही नागरिकांच्या समस्या ऐकून घेत भ्रष्टाचारमुक्त कारभार, पारदर्शक प्रशासन व नागरिकांसाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

**कार्यकर्त्यांचा उत्साह शिखरावर**

या पदयात्रेत भाजपचे ज्येष्ठ नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये जीवन सले, धनराज काबलीये, अमोल कारंजेकर, कपिल दहेकर, गंभीर पडूळ, भागवत बावणे, नारायण पवार, डॉ. सुदर्शन काळे, डॉ. श्रीकांत सपकाळ, रमेश दानवे, अमन मित्तल, रोहित नलावडे, विकास कदम, सुनील राठी, रोषण चौधरी, मयूर ठाकूर, संदीप भोसले, राजू जगताप, सुभाष सले, बाबा सले, रोहित दीपवाल, हरिभाऊ नाटकर, दत्ता जाधव, स्नेहा जोशी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे प्रचाराला अधिकच धार चढली. घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद साधत कमळाला मत देण्याचे आवाहन करण्यात आले.

**विरोधकांचे नियोजन फसले, मतदार भाजपच्या बाजूने**

प्रभाग ०१ मध्ये विरोधी पक्षांनी आखलेली सर्व समीकरणे कोलमडली आहेत. जनतेचा रोष भाजपविरोधात वळवायचा हा विरोधकांचा डाव सपशेल फसला आहे. भाजपच्या एकसंध टीम वर्कपुढे विरोधकांची गटबाजी, अंतर्गत वाद आणि उमेदवार निवडीतली चूक उघडी पडली आहे. ही बाब सत्तांतराचा मोठा संकेत मानला जात आहे.

**पदयात्रेतून शक्तिप्रदर्शन, ‘कमळ’चा नाद प्रभागभर...**

८ जानेवारी रोजी काढलेली पदयात्रा ही केवळ प्रचार नव्हता, तर तो भाजपचा शक्तिप्रदर्शनाचा शो ऑफ स्ट्रेंथ होता. कमळच आमची पसंती या घोषणांनी परिसर दणाणून गेला. घोषणांचा आवाज जितका मोठा, तितकाच विरोधकांच्या छावणीत धडकी भरवणारा ठरला. महिलांनी औक्षण केले, ज्येष्ठांनी आशीर्वाद दिले, युवकांनी अंगावर झेंडे घेऊन प्रचार केला. हे चित्र सांगत होते की, जनता आधीच भाजपच्या बाजूने कौल देऊन टाकला आहे.

**भास्कर दानवेंचा करिष्मा, नेतृत्वावर जनतेचा विश्वास**

भास्कर आबा दानवे हे केवळ उमेदवार नसून भविष्यातील प्रभावी नगरसेवक म्हणून जनता त्यांच्याकडे पाहत आहे. त्यांची मितभाषी शैली, थेट संवाद आणि जमिनीवर उतरून काम करण्याची तयारी यामुळे मतदारांमध्ये विश्वासाची लाट निर्माण झाली आहे.

**भाजप टीमवर्क विरुद्ध विरोधकांची अराजकता**

भाजपचे सर्व उमेदवार एकाच दिशेने, एकाच घोषवाक्याने, एकाच रणनीतीने मैदानात उतरले आहेत. तर विरोधक मात्र आपापसात कुरघोडी, नेतृत्वाचा अभाव यामुळे गोंधळात सापडले आहेत. याचा थेट फायदा भाजपला होत आहे. सत्ता बदलाची नाही, सत्ता ‘पक्की’ करण्याची लढाई ही निवडणूक केवळ सत्ता मिळवण्याची नाही, तर जालना शहरात भाजपचे वर्चस्व पक्के करण्याची लढाई आहे.

प्रभाग ०१ हा या लढाईचा ‘गेम चेंजर’ ठरणार आहे. जनता बदलाच्या मूडमध्ये नाही, विकासाच्या मूडमध्ये आहे! मतदार आता भावनिक नाही तर व्यावहारिक राजकारण करत आहेत. त्यांना घोषणाबाजी नाही, तर काम करणारे नेतृत्व हवे आहे. आणि हे नेतृत्व भाजपकडे आहे, असा ठाम विश्वास नागरिकांमध्ये दिसत आहे.

प्रभाग क्रमांक ०१ मध्ये भाजपचा विजय आता शक्यता नसून राजकीय वास्तव बनले आहे. विरोधकांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची नाही, अस्तित्वाची लढाई ठरत आहे. भास्कर दानवे यांच्यासह भाजपाच्या अधिकृत सर्वच उमेदवारांनी राजकीय पटावर भाजपचा झेंडा रोवला आहे!

---

### जनगणना अधिकारी-कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न

# डिजीटल जनगणनेतील अद्यावत तंत्रज्ञानामुळे माहिती विश्वसनीय ठरेल -शशिकांत हदगल

**जालना । प्रतिनिधी -** भारताची जनगणना ही एकाच टप्प्यात पार पडणार आहे. कोणतेही घर अथवा कुटुंब या जनगणनेतून सुटता कामा नये, या जनगणनेचा मुख्य उद्देश फक्त आकडे गोळा करणे नसून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची इत्यंभूत माहिती गोळा केली जाणार आहे. आपणास संपुर्ण घर यादी व गटाची संरचना समजावून सांगण्यात येत आहे. तरी डिजीटल जनगणनेतील वापरात येणाऱ्या अद्यावत तंत्रज्ञानामुळे अधिक अचूकता आणि पारदर्शकतेसह जनगणनेला गती मिळुन माहिती अधिक विश्वसनीय ठरेल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

महाराष्ट्र जनगणना संचालनालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या वतीने आज दि.८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते २.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पहिले प्रशिक्षण पार पडले. जनगणना संचालनालयाचे अधिकारी प्रविण भगत व अरुण साळेगावकर यांनी संगणकीय सादरीकरण व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सुलभ पध्दतीने प्रशिक्षण दिले. यावेळी घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांच्यासह महानगरपालिका अधिकारी, सर्व तहसीलदार, नगर परिषद मुख्याधिकारी, नायब तहसिलदार, सहाय्यक महसुल अधिकारी, मंडळ अधिकारी, नगर रचनाकार व जनगणना लिपिक आदि अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जनगणना प्रक्रियेच्या पहिल्या टप्यामध्ये घर यादी व घरगणना ही मे ते जून २०२६ मध्ये सुरु होणार असुन त्याबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचाही आज प्रारंभ झाला आहे. राष्ट्रीय जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणार आहे. जनगणनेचे काम अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे जनगणना कामाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी प्रशिक्षण, आढावा बैठकीस हजर राहणे व प्रत्यक्ष सोपविण्यात आलेली जबाबदारी अचूकपणे पार पाडणे व प्रशिक्षण दिलेल्या सूचनाचे काटेकोर पालन करून कामकाज पार पाडावेत. तरी जनगणना २०२७ जनगणना कामासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अचूक माहिती संकलनासाठी सुयोग्य नियोजन करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी यावेळी सुचित केले. जालना जिल्ह्यात अद्यावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलीत केली जाणार आहे. अचूक विश्वासार्ह लोकसंख्येची आकडेवारी मिळविण्यासाठी यावेळी मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रियेच्या देखरेखीसाठी केंद्रीय पोर्टल कार्यान्वित राहणार आहे. त्यामुळे जनगणना संबंधीत सर्व चार्ज अधिकारी कर्मचारी यांनी गट नियोजन, पर्यवेक्षक, प्रगणक यांच्या नियुक्तीबाबत आवश्यक नियोजन तसेच जनगणना प्रक्रियेतील प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक समजून घेऊन अमंलबजावणी करण्याचे निर्देशही प्रशिक्षणात अधिकाऱ्यांना यावेळी दिले.



---

### शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे थाटात विमोचन

# सभासदांपर्यंत संस्थेच्या सर्व योजना व माहिती पोहोचवणे हा उद्देश -जगत घुगे



**जालना । प्रतिनिधी -** जालना व बदनापूर तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या नूतन वर्ष दिनदर्शिकेचे विमोचन पतसंस्थेच्या सभागृहात करण्यात आले.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक सभासदापर्यंत तसेच प्रत्येक शाळेपर्यंत संस्थेच्या सर्व योजनांची माहिती पोहोचवणे हा मुख्य उद्देश समोर ठेवून सदर दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली असल्याचे पतसंस्थेचे चेअरमन जगत घुगे यांनी सांगितले. दिनदर्शिकेच्या स्वरूपात सर्व योजनांची माहिती, ठेवी व त्यावरील व्याजदर , ठेवींचा परतावा तसेच संस्थेचे डिजिटल प, ऑनलाइन व्यवहारासंबंधी मार्गदर्शन, या सर्व बाबींचा देखील उहापोह दिनदर्शिकेद्वारे करण्यात आलेला आहे, असे ते म्हणाले.

यावेळी पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष मंगेश जैवाळ, व्हाईस चेअरमन श्रीमती साधना गिन्हे, महाराष्ट्र राज्य समता शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष तथा संस्थेचे खजिनदार अरुणराव जाधव, सचिव संतोष देशपांडे, शिक्षक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष तथा संस्थेचे संचालक रमेशजी हुशे, विकास पोथरे, जगन्नाथ शिंदे, सुभाष भडांगे, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष ईश्वरजी गाडेकर, समता शिक्षक संघाचे जिल्हा सरचिटणीस परमेश्वर साळवे यांच्यासह व्यवस्थापक ज्ञानेश्वर मराठे, शैलेश धोत्रे, हिमेश तोडकर आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# संपादकीय पान

## तेलसाठ्यासाठीच अमेरिकेची दंडेलशाही

जगात लोकशाही, मानवाधिकार आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे धडे देणारी अमेरिका प्रत्यक्षात किती दांभिक आहे, याचा आणखी एक जिवंत पुरावा म्हणजे व्हेनेझुएलावर केलेला हल्ला. इंधन तेलाने समृद्ध असलेल्या व्हेनेझुएलावर हल्ला करून त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अटक करून अमेरिकेच्या तुरुंगात डांबण्यात आले. हा प्रकार म्हणजे जागतिक राजकारणातील उघडी दंडेलशाही आहे. हा हल्ला अचानक झालेला नाही. गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने व्हेनेझुएलावर टीका करत होते. अमेरिकेने हल्ल्यानंतर दिलेले कारण म्हणजे अमेरिकेत होणाऱ्या बेकायदेशीर ड्रग्स व्यापारासाठी व्हेनेझुएला जबाबदार आहे. पण हा दावा किती तकलादू आहे हे संपूर्ण जग जाणते. कारण अमेरिकेचा इतिहास पाहिला तर हे स्पष्ट होते की अंमली पदार्थ हा केवळ बहाणा असतो, खरा हेतू असतो तो तेल आणि नैसर्गिक संपत्तीवर ताबा मिळवण्याचा. व्हेनेझुएला हा जगातील चौथ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. जगातील सर्वात मोठ्या तेलसाठ्यांपैकी एक व्हेनेझुएलात आहे. अमेरिकेला हे तेलसाठे हवेत - हे उघड सत्य आहे. मादुरो सरकार जोपर्यंत सत्तेत आहे तोपर्यंत अमेरिका आपले मनसुबे पूर्ण करू शकत नाही. म्हणूनच राजकीय अस्थिरता निर्माण करणे, हल्ला करणे आणि आपल्या मर्जीतील बाहुले सत्तेवर बसवणे हेच अमेरिकेचे धोरण राहिले आहे. ट्रम्प यांनी या हल्ल्यातून अमेरिका स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्या थराला जाऊ शकते हे पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे. ही केवळ लष्करी कारवाई नाही, तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीचे उघड उल्लंघन आहे. अमेरिकेच्या या दंडेलशाहीविरुद्ध आता जगभरातील देशांनी आवाज उठवणे गरजेचे आहे. आज गप्प बसलो तर उद्या कुणाची पाळी येईल सांगता येणार नाही. संयुक्त राष्ट्रसंघ, मानवाधिकार संघटना, जागतिक शक्तींनी आता अमेरिकेला लगाम घालण्याची वेळ आली आहे. व्हेनेझुएलावरचा हल्ला म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्याचा अपमान लोकशाहीचा खून साम्राज्यवादाचा उघडा चेहरा तेलासाठी चाललेला रक्तरंजित खेळ ही दंडेलशाही थांबवली नाही तर जगात युद्धाचा भडका उडायला वेळ लागणार नाही. आता संपूर्ण जगाने एकत्र येऊन तेलासाठी चाललेल्या या रक्तपाताला पूर्णविराम द्यायलाच हवा!

# मोटार सायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; एक लाख १० हजार किमतीच्या दोन दुचाकी जप्त



**जालना प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात मोटार सायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिलेल्या स्पष्ट सूचनांनुसार स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) मोठी कारवाई करत मोटार सायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस जेरबंद केले आहे. या कारवाईत रु १,१०,०००/- किमतीच्या दोन चोरीच्या मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

मोटार सायकल चोरीचे वाढते प्रकार लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना अशा गुन्ह्यांचा शोध घेऊन ते उघड करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक गठीत करून सर्व अधिकारी व अंमलदारांना मार्गदर्शन केले.

तपासादरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सलीम खान रशिद खान (वय ३२ वर्षे, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना) याच्याकडे चोरीच्या मोटार सायकली असल्याची शक्यता आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीस त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.

पोलीस चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली देत हिरो स्प्लेंडर व होंडा सीबी शाईन अशा दोन मोटार सायकली चोरी केल्याचे सांगितले. आरोपीच्या सांगण्यावरून रु १,१०,०००/- किमतीच्या या दोन्ही मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या असून त्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

**दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांशी संबंध उघड**

जप्त केलेल्या मोटार सायकलींचा अभिलेख तपासला असता बदनापुर पोलीस ठाणे, जालना - गुन्हा रजिस्टर क्रमांक १२५/२०२५, कलम ३०३(२) भा.न्या.सं., अंढेरा पोलीस ठाणे, बुलढाणा - गुन्हा रजिस्टर क्रमांक १५९/२०२४, कलम ३०३(२) भा.न्या.सं. या गुन्ह्यांमध्ये संबंधित दुचाकी चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

**आरोपी पुढील तपासासाठी बदनापुर पोलिसांच्या ताब्यात**

आरोपीस पुढील तपासकामी बदनापुर पोलीस ठाणे, जालना येथे सुपूर्द करण्यात आले असून, त्याच्याकडून आणखी चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतीश श्रीवास, रमेश काळे, किशोर पुंगळे, कैलास चेके, अशोक जाधव आदी सर्व स्थानिक गुन्हे शाखा, जालना पथकातील सदस्य सहभागी होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे मोटार सायकल चोरी करणाऱ्या टोळ्यांना मोठा धक्का बसला असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. जालना जिल्ह्यात गुन्हेगारीविरोधात पोलिसांची कारवाई पुढेही अशीच अधिक तीव्र राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा;

# शेती व पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, शेती व पीक कर्जाशी संबंधित कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्याचा शासन निर्णय लागू करण्यात आला आहे. सर्व संबंधित बँकांनी व वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांकडून शेती अथवा पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे स्विकारतांना या शासन निर्णयानुसार कोणतेही मुद्रांक शुल्क आकारु नये, तसेच शेतकऱ्यांना याबाबत योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ९ (अ) अंतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, रु. २,००,००० (दोन लाख) पर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जासाठी शेतकऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या विविध कर्ज दस्तऐवजांवर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. यामध्ये अभिस्वीकृती (Acknowledgement), रोख पत करार (Cash Credit greement), हक्कविलेख निक्षेप (Deposit of Title Deeds), हडप, तारण किंवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखताचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न कोणत्याही संलेखांचा/कागदपत्रांचा समावेश आहे. ही सवलत दि. १ जानेवारी २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अल्पभूधारक व मध्यम शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होणार असून, शेती व पीक कर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ, कमी खर्चिक आणि पारदर्शक होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध होऊन शेती उत्पादन वाढीस चालना मिळेल. सदर शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सदर निर्णयाची माहिती उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना व जिल्हा अग्रणी बँक, जालना यांनी त्यांचेमार्फत जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ग्रामीण बँका तसेच इतर संबंधित वित्तीय संस्थांना हा निर्णय अवगत करून देण्यात यावा.

# मुक्त विद्यापीठात तीन दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन




**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'समावेशक व समताधिष्ठित शिक्षण : नवीन शैक्षणिक धोरण - २०२० च्या परिप्रेक्ष्यात वैविध्यपूर्णतेसाठी शिक्षकांची सज्जता' या विषयावरील बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद तसेच कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन फाउंडेशन (उढएऋ- सीटीईएफ) यांच्या ३९ व्या वार्षिक परिषदेचे उद्घाटन दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ (छणएझ) यांच्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा व सीटीईएफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही तीन दिवसीय परिषद ८ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान होत आहे. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (पिंपरी-पुणे) चे कुलगुरू प्रा. एन. जे. पवार, सीटीईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. एम. भांडारकर, सीटीईएफच्या आंतरराष्ट्रीय सचिव प्रा. नीलिमा भगवती, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका डॉ. संजीवनी महाले तसेच निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी म्हणाल्या की, विकसित भारत - २०४७ चे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भारतीय शिक्षणपद्धती ही सर्वसमावेशक, समताधिष्ठित व निरंतर असणे आवश्यक आहे. भारताची सांस्कृतिक परंपरा, गुरु-शिष्य परंपरा आणि मूल्याधिष्ठित शिक्षण लक्षात घेऊन शिक्षणव्यवस्था विकसित झाली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये यालाच प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षणसंस्थांनी अभ्यासक्रमाची दिशा आणि शिक्षकांची गुणवत्ता यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. वाढत्या खासगी शिक्षणसंस्थांतील शिक्षक व शिक्षणाची गुणवत्ता तपासली गेली पाहिजे. भविष्यातील दृष्टीने शिक्षक शिक्षणाची सुरुवात नेमकी कुठून करायची, हे ठरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्या म्हणाल्या. मुक्त विद्यापीठ विविध शिक्षणक्रमांद्वारे करत असलेले कार्य विकसित भारत - २०४७ चे लघुरूप असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. सीटीईएफच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी विकसित भारत - २०४७ चा विचार करताना देशाच्या विकासासाठी उपलब्ध ज्ञान, साधने आणि परिस्थितीनुसार प्रत्येकाने स्वतःची भूमिका निश्चित करावी, असे आवाहन केले. सीटीईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. एम. भांडारकर यांनी भारतीय प्रशासकीय सेवा (खड) प्रमाणे भारतीय शिक्षण सेवा सुरू करावी, तसेच प्राथमिक ते विद्यापीठ स्तरावरील शिक्षकांसाठी राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र निधी (फंड) ची कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्यात यावी, अशी मागणी केली. सीटीईएफच्या आंतरराष्ट्रीय सचिव प्रा. नीलिमा भगवती यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना नेपाळ व भूतानमध्ये संघटनेचे कार्य सुरू असून, आगामी काळात थायलंड व श्रीलंका येथेही कार्य विस्तारण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते ' दूरस्थ शिक्षण पद्धतीने शिक्षकांचे शिक्षण: मुक्त विद्यापीठाच्या बी. एड. शिक्षणक्रमाचा चिकित्सक अभ्यास' या व परिषदेतील शोधनिबंध सारांश या दोन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

दुपारच्या सत्रात विकसित भारत - २०४७ या विषयावर कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांच्या नेतृत्वाखाली परिसंवाद घेण्यात आला. यामध्ये कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, डॉ. के. एम. भांडारकर, डॉ. गजानन गुल्हाने आणि हिमाचल प्रदेशचे प्रा. मनोज सक्सेना यांनी सहभाग घेत आपले विचार मांडले. दिवसाच्या अंतिम सत्रात सहभागी विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. परिषद समन्वयक डॉ. संजीवनी महाले यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती शुभांगी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमात सीटीईएफतर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांना 'आयकॉन ऑफ टीचर एज्युकेशन' पुरस्काराने, तर राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन विद्यापीठ (छणएझ) च्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांना 'अवॉर्ड ऑफ एक्सेलेन्स इन टीचर एज्युकेशन' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

# उत्कृष्ट परिपाठाचे सादरीकरण; विद्यार्थ्यांचा सत्कार



**पाटोदा । प्रतिनिधी -** शालेय जीवनात शिस्त आणि मूल्यांची रुजवण करण्यासाठी परिपाठाचे विशेष महत्त्व आहे. तालुक्यातील पाटोदा येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेच्या इयत्ता आठवीच्या अनुष्का बोराडे, धनश्री बोराडे, राधिका पारधे, अंकिता बनसोडे, अश्विनी बोराडे, जीविका या विद्यार्थिनींनी ८ डिसेंबर रोजी उत्कृष्ट परिपाठ सादर केला. त्यांचा परिपाठ सर्व विद्यार्थ्यांना भावला. त्यामुळे परिपाठातील सहभागी सर्व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन शाळेच्या वतीने मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी सत्कार केला.

# बालविवाह निर्मुलनासाठी जिल्ह्यात ७३६२ नागरिकांनी घेतली शपथ

**जालना । प्रतिनिधी -** बालविवाहाची प्रथा नष्ट करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या बाल विवाह मुक्त भारत मोहिमेला २७ नोव्हेंबर २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण होईल. बालविवाहमुक्त भारताचे स्वप्न साध्य करण्यासाठी हस्तक्षेपांची गती वाढविण्यासाठी, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १०० दिवसांची मोहीम (२७ नोव्हेंबर २०२५ ते ८ मार्च २०२६ पर्यंत) हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर अभियान हे प्रत्येक संस्था, आणि विवाहासाठी सेवा पूरविणाऱ्या पर्यंत पोहोचले आहे आणि प्रत्येक राज्यातील बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी (उचझजी) त्यांची माहिती बाल विवाह मुक्त भारत पोर्टलवर अपलोड केली आहे. याची खात्री करण्यासाठी ही मोहीम एका दृष्टिकोनाने आयोजित केली जात आहे.

सदर कालावधीमध्ये बालविवाह मुक्त भारत अभियान १०० दिवस जिल्हा महिला व बाल विकास विभाग यांच्याकडुन राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्हयात बालविवाहाचे समुळ उच्चाटन व्हावे या अनुषंगाने विहित पातळीवर प्रशासनाकडुन जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह थांबविण्याकरीता २४ तास १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सेवा सुरु आहे. तसेच प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकांनी देखील बालक-बालिकांचे शारीरिक, मानसिक आरोग्य तसेच बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बाल विवाह होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व स्तरावरुन सर्वांनी बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणुन बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले आहे व हे सर्व नागरिकांसाठी खुले आहे. तरी बालविवाह मुक्त भारत पोर्टल या पोर्टलवर जाऊन https://stopchildmarriage.wcd.gov.in या लिंकवर क्लिक करुन बालविवाह निर्मुलनाबाबत प्रतिज्ञा घ्यावी व प्रतिज्ञा घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल तसेच जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

तसेच बालविवाह निर्मुलनाबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, सखी वन स्टॉप सेंटर, महिला व बाल कल्याण जि.प., शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पंचायत विभाग व पोलीस प्रशासन यांनी आतापर्यंत जिल्हयाभरात ८५७ ठिकाणी विविध स्तरावर कार्यक्रम घेतले असुन ६१५९६ सहभागी झालेले आहेत. आतापर्यंत या मोहिमेमध्ये ७३६२ नागरिकांनी सहभाग नोंदवुन बाल विवाह निर्मुलनाबाबत शपथ घेतली आहे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

जालना शहरातील चौथा मोक्का

# व्यापाऱ्याच्या घरावर दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर चंदनझिरा पोलिसांची मोक्का अंतर्गत धडक कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात सराईत व संघटीत गुन्हे करणाऱ्या टोळ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सर्व पोलीस ठाणे प्रमुखांना दिल्यानंतर चंदनझिरा पोलिसांनी मोठी कारवाई करत दरोडेखोर टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही जालना शहरातील चौथी मोक्का कारवाई ठरली असून गुन्हेगारांच्या गोटात खळबळ उडाली आहे.

चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्रीकृष्ण रुख्मिणी नगर परिसरात दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास काही अज्ञात दरोडेखोरांनी व्यापाऱ्याच्या घराबाहेर तैनात असलेल्या वॉचमनला पिस्टलचा धाक दाखवून दरोड्याचा प्रयत्न केला होता.

याच टोळीने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुद्धा पिस्टलचा धाक दाखवून व्यापाऱ्याच्या घरावर दरोडा टाकत रोख रक्कम लुटून नेली होती. या दोन्ही घटनांमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले होते.

या गंभीर गुन्ह्यांनंतर चंदनझिरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. तपासाअंती सचिन कैलास गायकवाड (रा. चंदनझिरा, जालना) याने आपल्या टोळीतील साथीदारांच्या मदतीने हे दरोडे टाकल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी कारवाई करत सहा सराईत दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून पिस्टल जप्त करण्यात आली आहे.

टोळीप्रमुख सचिन गायकवाड व त्याच्या साथीदारांविरोधात यापूर्वीही अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे सखोल तपासात स्पष्ट झाले आहे. ही टोळी संघटीत स्वरूपात गुन्हे, शस्त्रांचा वापर, व्यापाऱ्यांना लक्ष्य, नागरिकांमध्ये दहशत, कायद्याची भीती नसलेली मानसिकता अशा पद्धतीने वारंवार गुन्हे करत असल्याचे समोर आले आहे.

तपासात या टोळीने समाजात दहशत निर्माण करणे, सामान्य नागरिकांमध्ये भीती पसरवणे, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेला धोका निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणे या उद्देशाने वारंवार गुन्हे केल्याचे ठोस पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत. त्यामुळे या टोळीविरोधात कठोरात कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले.

**मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल**

या पार्श्वभूमीवर चंदनझिरा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी टोळीप्रमुख सचिन कैलास गायकवाड व त्याचे साथीदार यांच्यावर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पुढील तपास अत्यंत गांभीर्याने सुरू आहे.

**पोलिस अधीक्षकांचा इशारा**

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, संघटीत गुन्हेगारीविरोधात जालना पोलीस दलाची झिरो टॉलरन्स भूमिका आहे. समाजात दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही. नागरिकांची सुरक्षितता, शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा कठोर कारवाया पुढेही अधिक तीव्रपणे राबवल्या जातील.

ही संपूर्ण कारवाई अजय कुमार बंसल - पोलीस अधीक्षक, जालना, आयुष नोपानी - अप्पर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी - उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार (चंदनझिरा), पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थानिक गुन्हे शाखा), सपोनि सुशील चव्हाण, पोहेकॉ रुस्तुम जैवाळ, पोहेकॉ अभिजीत वायकोस, पोहेकॉ कृष्णा तंगे, पोलीस नाईक हारुन पठाण, पोकों दिपक डेहंगळ, कोर्ट पैरवी मपोहेकॉ सिमा जाधव, पोकों परमेश्वर काळे, या पथकाने धाडसी व अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत गुन्हेगारांवर मोठी कारवाई केली आहे.

जालना शहरातील ही चौथी मोक्का कारवाई असून संघटीत गुन्हेगारीविरोधात पोलिसांची भूमिका अधिक आक्रमक झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये भीती, व्यापाऱ्यांना दिलासा, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

# जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मराठा सेवा संघ प्रेरणित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समिती २०२६ यांच्या वतीने जालना जिल्ह्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत दिनांक १० जानेवारी रोजी मराठा सेवा संघ कार्यालयात रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा विषय

संस्कार, शौर्य आणि स्वराज्य - जिजाऊंची त्रिसूत्री असा असून, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना जन्मोत्सव समितीच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.



जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतून सहभागी विद्यार्थ्यांची निवड करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या स्पर्धकांची यादी दिनांक १० जानेवारीपर्यंत समितीकडे सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रांगोळी व वक्तृत्व स्पर्धेत प्रावीण्य मिळविणाऱ्या गुणवंतांचा सत्कार सोहळा दिनांक ११ जानेवारी, रविवार रोजी सायंकाळी ५ वाजता मातोश्री लॉन्स, अंबड रोड, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता प्रा. एकनाथ शिंदे यांचे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास जिजाऊ भक्तांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष बबनराव गाडेकर (९६९९०५७३७७), कार्याध्यक्ष सोमीनाथ हराळ (९०४९८१०००७) व सचिव दिनेश भुतेकर (९९७५६३८५५५) यांनी केले आहे. रांगोळी स्पर्धेचे नियोजन शिवमती मंजुश्रीताई झोडगे (९१५६९७०६०८) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

बदनापूर तालुक्याचा डंका!

# आकांक्षित तालुका कार्यक्रमात बदनापूर राज्यात प्रथम; उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी -कर्मचाऱ्यांचा झाला गौरव

**बदनापूर । प्रतिनिधी -** केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'आकांक्षित तालुका कार्यक्रमा' (Aspirational Block Programme - BP) अंतर्गत बदनापूर तालुक्याने यश संपादन केले आहे. या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी -कर्मचाऱ्यांचा पंचायत समिती बदनापूर येथे सेमिनार आणि गौरव सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी. एम. मन्नू यांची प्रमुख उपस्थिती होती.

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत विविध विकास निर्देशांकांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे माहे जून २०२५ मध्ये बदनापूर तालुक्याचा राष्ट्रीय स्तरावर ३१ वा आणि महाराष्ट्र राज्यात पहिला क्रमांक आला आहे. या यशाबद्दल श्रीमती मन्नू यांनी गट विकास अधिकारी श्रीमती ज्योती राठोड आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले. उल्लेखनीय कार्याबद्दल यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.



पुणे येथील 'प्रशिक्षण, मूल्यमापन आणि संशोधन संस्थेचे' (ITER) संचालक श्री. लक्ष्मीकांत शिंदे यांनी या सेमिनारमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी आरोग्य, शिक्षण, कृषी, पायाभूत सुविधा आणि प्रशासन या पाच प्रमुख विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. हा उपक्रम केवळ तपासणी नसून अविकसित भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी आहे, असे सांगत त्यांनी डेटा-आधारित नियोजन आणि घरभेटींच्या महत्त्वावर भर दिला.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मन्नू यांनी उपस्थित सर्वांना संबोधित करताना सांगितले की, निर्देशांकांची १०० टक्के संतृप्तता गाठण्यासाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांमध्ये संवाद, समन्वय आणि सहकार्य असणे आवश्यक आहे. सर्व फ्रंटलाईन वर्कर्सनी आंतरविभागीय समन्वयातून कामात सातत्य ठेवावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाला जिल्हा आरोग्य अधिकारी तथा संपर्क अधिकारी श्रीमती जयश्री भुसारे, तालुका आरोग्य अधिकारी श्री. पी. एस. सोनटक्के, गटशिक्षणाधिकारी श्री. डी. एन. क्षीरसागर, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती जाधव, उपअभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) श्री. डी. बी. पिसे यांच्यासह तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, केंद्रप्रमुख, समुदाय आरोग्य अधिकारी, बचत गटातील महिला आणि पंचायत समितीचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गट विकास अधिकारी श्रीमती ज्योती राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्री आत्मानंद विद्यालयात आनंद नगरी उत्सव साजरा; पस्तीस हजाराची झाली उलाढाल



**आव्हाना । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील आव्हाना येथील श्री आत्मानंद विद्यालय या शाळेत आनंदनगरी उत्सव साजरा करण्यात आला यावेळी जवळपास ३५ हजाराची उलाढाल झाल्याचे विद्यार्थी व शिक्षक यांनी सांगितले.

शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीक विकास होण्यासाठी व व्यवहार ज्ञान मिळण्यासाठी शाळेच्या वतीने आनंदनगरी उत्सव साजरा करण्यात आला यावेळी केंद्रीय प्राथमिक शाळा आव्हाना प्राथमिक शाळा दहिगाव या शाळेच्या विद्यार्थ्यांनी या आनंदनगरी उत्सवाचा लाभ घेतला. शाळेतील विद्यार्थी यांनी सकाळी नऊ वाजता आप आपले स्टॉल लावून तयारी केली होती. शाळेच्या मुख्य दरवाजाजवळ विद्यार्थिनी काढलेल्या रांगोळीने सर्वांचे मन आकर्षण करून घेतली होती. सकाळी दहा वाजता आव्हाना गावचे सरपंच राम दुधे, ग्रामपंचायत अधिकारी वाय आर वाघ व संस्थेचे अध्यक्ष उत्तमराव गावंडे यांच्या हस्ते कार्यक्रमाची रेबीन कापून उद्घाटन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉलमध्ये चहा हॉटेल, भज्यांचे हॉटेल, कॅटलिस्ट पाणीपुरी भेळ, मसाला पापड, वडापाव, मसाला डोसा, दाबोली, गुलाब जामुन, अशा अनेक पदार्थांद्वारे आपले स्टॉल ठेवले होते उद्घाटनानंतर उपस्थित सर्वांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या स्वतःच्या हाताने व गरम वस्तूचा आस्वाद घेतला यावेळी उपस्थित विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करून जवळपास ३५ हजार रुपयाची उलाढाल या आनंदनगरीमध्ये झाल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष उत्तमराव गावंडे सरपंच राम दुधे, ग्रामपंचायत अधिकारी वाय आर वाघ, केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गुलाबराव उजागरे, प्राथमिक शाळा दहिगाव चे मुख्याध्यापक कासार सर,माजी उपसरपंच कौतिक पांढरे, रामराव लहाणे, समाधान साळवे, डॉ.राजू गायकवाड, सरदारसिंग कायटे, शंकर कायटे, आनंदा गायकवाड, भाऊसाहेब गावंडे, दिलीप ठाले, नवनाथ ठाले, संजय गावंडे,यांच्यासह मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ माजी विद्यार्थी केंद्रीय प्राथमिक शाळा सर्व शिक्षक प्राथमिक शाळा दहिगाव सर्व शिक्षक व आत्मानंद विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती

# पाटोदा जिल्हा परिषद शाळेत नाणी नोटांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर - गटशिक्षणाधिकारी

**पाटोदा । प्रतिनिधी -** येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेत ७ जानेवारी रोजी प्राचीन नाणी नोटांसह पोस्टाच्या तिकिटांचे अनोखे प्रदर्शन भरवण्यात आले होते. प्राथमिक शिक्षक मनोजकुमर जक्केवाड यांचा हा दुर्मिळ संग्रह विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात आला होता. या प्रदर्शनात प्रशाला, प्राथमिक शाळा पाटोदा,शंकर नगर येथील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालकांना प्राचीन चलनाच्या इतिहासाची पुरातन नाणी, तिकीट, परदेशी चलनाची माहिती मिळाली. गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी के.जी. राठोड यांनी जक्केवाड यांचे कौतुक केले.

प्रदर्शनादरम्यान भारतीय व विदेशी नाणी आणि नोटांचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. काही दुर्मिळ सोन्या-चांदीची शिवकालीन व मुघलकालीन नाणी विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. गणेशराव चव्हाळ,अशोकराव बोराडे, महादेव तुळशीराम बोराडे, होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नामदेव चव्हाळ, नंदकिशोर पारसकर,गंगाधर वानोळे, संतोष तोटेवाड, देविदास मामीलवार,



मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे, तुळशीराम घुटे, नामदेव बोराडे, दगडोबा मिसाळ, गजानन वायाळ, सुरज जाधव, सुनील राठोड,आसाराम बोराडे, पुंडलिक यमुलवाड, अनिल बोराडे, दत्ता मोरे, रत्नाकर बोराडे, सुरेश बोराडे, विठ्ठल बोराडे आदींची उपस्थिती अनुजा पाटील, रंगनाथ मरपडवाड, गीता बरसाले, सुदाम देशमुख, हनुमान वाघ, नरसिंग सगरे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.५०० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. सूत्रसंचालन नामदेव चव्हाळ यांनी केले तर आभार गंगाधर वानोळे यांनी मानले.

**झाडे लावा, झाडे वाढवा**




# स्थानिक नेतृत्वाच्या अपयशामुळे जालन्याची दुर्दशा - सुनील तटकरे

## राष्ट्रवादी काँग्रेस - मनसे युतीच्या जाहीर सभेत जोरदार हल्लाबोल






**जालना । प्रतिनिधी -** स्टील आणि बियाणे उद्योगातून हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणाऱ्या जालना शहराकडे स्थानिक राजकीय नेतृत्वाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे आज या शहराची अवस्था अत्यंत बिकट झाली असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला. आज दिनांक ८ जानेवारी रोजी जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस व महाराष्ट्र नवनिर्माण सेना युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गांधी चमन येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

या सभेला राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाजेर काझी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याशिवाय आमदार मनोज कायंदे, माजी आमदार मधुकर आर्डड, जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण, जिल्हा महानगराध्यक्ष शेख महेमुद, मनसेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र राऊत, माजी आमदार शिवाजी चोथे, प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, नितीन जेथलिया, रवींद्र तौर, शकुंतला कदम, शाह आलमखान, अण्णासाहेब चित्तेकर, अन्वर मिर्झा, वंदना खांडेभराड, रिंकल तायड आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

**'हजारो कोटींची उलाढाल, पण शहर बकाल' - तटकरे**

सभेत बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, जालना शहर हे बियाणे व स्टील नगरी म्हणून संपूर्ण देशात ओळखले जाते. येथे असलेल्या बाजारपेठांमधून दरवर्षी हजारो कोटी रुपयांची उलाढाल होते. एवढी मोठी आर्थिक ताकद असलेल्या शहराचा आज जो चेहरा आहे, तो स्थानिक नेतृत्वाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण आहे.

शहरातील खराब रस्ते, पाणीपुरवठ्याची समस्या, कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा, ड्रेनेज व्यवस्था, वाहतूक कोंडी, आरोग्य सुविधा आणि नागरी प्रश्नांकडे लक्ष वेधत त्यांनी सत्ताधारी नेत्यांवर जोरदार टीका केली.

शहराची बकाल अवस्था ही प्रशासनाची नव्हे, तर सत्ताधारी राजकीय नेत्यांच्या मानसिकतेची परिणती आहे. ज्यांना शहराचे कारभारी म्हणून निवडून दिले, त्यांनीच शहराच्या विकासाला खो दिला, असा आरोप तटकरे यांनी केला.

सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे उदाहरण देत म्हणाले, अजित पवार यांनी बारामती, पिंपरी-चिंचवड शहरांचा चेहरा बदलून टाकला. राजकीय इच्छाशक्ती असेल तर शहराचा सर्वांगीण विकास करता येतो, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे.

लाडकी बहिण योजनेचा उल्लेख करत तटकरे म्हणाले की, अर्थमंत्री असताना अजित पवार यांनी लाडकी बहिण योजनेसाठी तरतूद केली. आज राज्यातील २ कोटी ३५ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळतो आहे. ही योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड ठरली आहे.

मतदारांना आवाहन करताना तटकरे म्हणाले की, जालना महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस - मनसे युतीला सत्ता दिलीत, तर आम्ही शहराचा चेहरा बदलून टाकू. एवढ्यावरच न थांबता राज्याच्या अर्थसंकल्पात जालन्यासाठी झुकते माप देऊ. त्यांच्या या वक्तव्याने सभास्थळी उपस्थितांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

**महिलांसाठी विशेष सुविधा - रूपाली चाकणकर**

राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी महिलांना उद्देशून भाषण करताना म्हणाल्या की, लाडक्या बहिणींना नागरी सुविधा मिळाव्यात, सुरक्षितता मिळावी, त्यांचे जीवनमान उंचावावे, यासाठी जालनेकरांनी राष्ट्रवादी काँग्रेसला ताकद द्यावी.

**'युतीच्या उमेदवारांना निवडून द्या' - नेत्यांचे आवाहन**

यावेळी सुरज चव्हाण, ॲड. नाजेर काझी, धैर्यशील चव्हाण, रवींद्र राऊत यांनीही भाषणे केली.

महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस - मनसे युतीच्या उमेदवारांना मोठ्या संख्येने निवडून द्या. विकासासाठी सक्षम आणि मजबूत नेतृत्व गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

**'महापौर राष्ट्रवादी काँग्रेसचाच' - अरविंद चव्हाण**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण म्हणाले की, महायुतीच्या नेत्यांनी आम्हाला समाधानकारक जागा दिल्या नाहीत. त्यामुळे आम्ही मनसेला सोबत घेऊन निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचाच महापौर होईल, याबाबत आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

**सर्वधर्मीय उमेदवारांना संधी - शेख महेमुद**

प्रास्ताविक करताना जिल्हा महानगराध्यक्ष शेख महेमुद म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वधर्मीय, सर्वसमावेशक उमेदवारांना उमेदवारी देऊन राजकीय न्याय दिला आहे. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन आम्ही जालन्याचा विकास साधू.

**जाहीरनाम्याचे प्रकाशन**

याच सभेत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते जालना शहराचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. या जाहीरनाम्यात - पाणीपुरवठा सुधारणा, चांगले रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा, महिलांसाठी सुरक्षितता, युवकांसाठी रोजगार यासारख्या मुद्द्यांचा समावेश आहे.

या जाहीर सभेचे सूत्रसंचालन सतीश वाहुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. सोपानराव तेलगड यांनी केले.

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस - मनसे युतीने आक्रमक प्रचार सुरू केला असून, सुनील तटकरे यांच्या भाषणामुळे सत्ताधाऱ्यांविरोधात वातावरण तापल्याचे चित्र आहे. येत्या काही दिवसांत ही निवडणूक आणखी रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

# मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांच्याकडून 'एक खिडकी' व 'MCMC' कक्षाची पाहणी

## निवडणूक प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक करण्याच्या प्रशासनास सूचना

जालना । प्रतिनिधी - जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगामार्फत नियुक्त केलेले मुख्य निवडणूक निरीक्षक श्री. जगदीश मिनीयार (IS) आणि निवडणूक निरीक्षक श्री. हरीश धार्मिक यांनी आज जालना शहर महानगरपालिकेतील विविध निवडणूक कक्षांना भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

मुख्य निवडणूक निरीक्षकांनी सर्वप्रथम उमेदवारांना विविध परवानग्या देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'एक खिडकी' (Single Window System) कक्षाला भेट दिली. यावेळी त्यांनी परवानग्या देण्याच्या प्रक्रियेची माहिती घेऊन, उमेदवारांना कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय आणि विहित वेळेत सभा व रॅलीच्या परवानग्या मिळतील याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ आणि लोकाभिमुख करण्यासाठी यंत्रणेने तत्परतेने काम करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



त्यानंतर निरीक्षकांनी माहिती व जनसंपर्क विभाग - प्रसार माध्यम कक्ष आणि माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती (MCMC) कक्षाची पाहणी केली. माध्यम कक्षाद्वारे आजवर प्राप्त झालेले १० जाहिरात अर्ज आणि त्यापैकी ८ अर्जांना देण्यात आलेली परवानगी याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. दैनिक वृत्तपत्रांमधील बातम्यांचे कात्रण संकलन आणि सोशल मीडियावरील देखरेखीबाबत त्यांनी बारकाईने माहिती घेतली. आचारसंहितेचा भंग करणाऱ्या जाहिराती किंवा 'पेड न्यूज' संदर्भात तात्काळ आणि आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी माध्यम कक्षाला दिले.

महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

या पाहणी दौऱ्याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ आणि जालना महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक प्रक्रियेच्या तयारीबद्दल प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. निवडणूक यंत्रणा निर्भय आणि पारदर्शक वातावरणात काम करत असल्याची खात्री करण्यासाठी निरीक्षकांचा हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

# निवडणूक खर्चविषयक गठीत पथकाने नियमांचे काटेकोरपण पालन करावे

## जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी निवडणूक निर्णय अधिकारी निहाय गठीत करण्यात आलेल्या निवडणूक खर्च पथकाच्या कामकाजाचा आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सविस्तर आढावा घेतला.सर्वांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल उपस्थित पथकातील सदस्यांना निवडणूक प्रक्रियेत उमेदवारांच्या खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवून मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक सुनिश्चित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.तसेच निवडणूक खर्चाची अचूक नोंद, प्रचार साहित्याचे निरीक्षण, वाहन तपासणी, रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंची तपासणी आदी बाबींवर विशेष लक्ष देणे, उमेदवार व राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, खर्चाच्या बाबतीत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे आदेश संबंधित पथकांना देण्यात आले.

## प्रभाग १७ मधील निवडणुकीला हायकोर्टाकडून अंतरिम स्थगिती

मुंबई : राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होत असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. एकीकडे प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे राजकीय पक्षातील बडे नेते एकमेकांवर टीका टिपण्णी करून लक्ष वेधत आहेत. त्यातच, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यात जवळपास ७० उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी टीका केली होती. यासंदर्भात विरोधी पक्षातील काही नेते न्यायालयात (क्ळसहर्लेीीं) देखील गेले आहेत. त्यातच, आता नवी मुंबईतील (छर्रीळ ीीरलळ) प्रभाग क्रमांक १७ (अ) च्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे, आता येथील प्रभागात १५ जानेवारीला मतदान होणार का नाही, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर शाळेत उत्साहात स्वयंशासन दिन साजरा

**परतूर । माणिक जैस्वाल -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूर येथे दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत शालेय स्वयंशासन दिन अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ९०० हून अधिक विद्यार्थ्यांची शाळा यशस्वीरीत्या चालवण्यात आली, हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व एक दिवसाचे मुख्याध्यापक म्हणून इयत्ता दहावी 'क' मधील विद्यार्थी यशराज सुवर्णा राजाराम जाधव यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली ६ समित्यांची स्थापना करण्यात आली असून ६० महिला व पुरुष शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमादरम्यान शालेय समिती अध्यक्ष द. या. काटे महाराज, शिक्षणतज्ञ भगवान तात्या मोरे, बरीदे सर तसेच शालेय समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांनी एक ना एक वर्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कार्यक्रमाचे निरीक्षण केले. विशेष म्हणजे एका ही व्यक्तीने कार्यक्रमावर टीका केली नाही, उलट सर्वांनी नियोजन, शिस्त व विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाचे मुक्तकंठाने कौतुक केले.

कार्यक्रमाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे पार पडले.

राजनंदिनी काळे हिने सर्व विद्यार्थिनींचे नियोजन व नियंत्रण यशस्वीरीत्या सांभाळले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्या कुलकर्णी व भक्ती देशपांडे यांनी आत्मविश्वासपूर्ण शैलीत केले.

पर्यवेक्षक म्हणून रामानंद मगर, दिपाली निर्वळ, साक्षी साळवे, वैष्णवी उबाळे यांनी जबाबदारी पार पाडली, तर शिस्त विभाग प्रमुख दीपक राऊत यांनी संपूर्ण शाळेत शिस्तबद्ध वातावरण राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यशराज यांच्या नेतृत्वाखाली ५० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.

कार्यक्रमातील यशराज यांच्या अध्यक्षीय भाषणाने उपस्थितांना विशेष भावनिक केले. ज्येष्ठ शिक्षक आठवे सर यावेळी भावूक झाले.

विष्णुनाना कदम सर यांनी हा कार्यक्रम शाळेच्या इतिहासातील सर्वात मोठा असल्याचे नमूद केले.

मुख्याध्यापक गणेश राठोड सर यांनी कार्यक्रम अत्यंत शिस्तीत पार पडल्याचे सांगत समाधान व्यक्त केले.

समारोप प्रसंगी कदम सर म्हणाले, ज्या पद्धतीने यशराज यांनी नियोजन व भाषण केले, त्या क्षमतेने तो उद्याचा अधिकारी आहे. तरवटे मॅडम व गाडगे सर यांनीही कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले. हा शालेय स्वयंशासन दिन विद्यार्थी नेतृत्व, शिस्त, सहकार्य व नियोजनाचा उत्कृष्ट आदर्श ठरला असून शाळेच्या इतिहासात हा कार्यक्रम सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल , अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.